महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**क्रमांक :** क्रमांक:२२५३/मरातांसे (पूर्व)/उ.ता./२०२१/१६-२ **दिनांक :- ०४ मे, २०२२**

## - घोषणा -

**विषय :- 'महाराष्ट्र राजपत्रित तांत्रिक सेवा संयुक्त (पूर्व) स्पर्धा परीक्षा-२०२१'**या परीक्षेच्या प्रथम उत्तरतालिकेवरील हरकती केवळ ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **दिनांक ३० एप्रिल, २०२२** रोजी घेण्यात आलेल्या **'महाराष्ट्र राजपत्रित तांत्रिक सेवा संयुक्त (पूर्व) स्पर्धा परीक्षा-२०२१'** या परीक्षेच्या वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या प्रश्नपुस्तिकेच्या चारही संचाच्या प्रथम उत्तरतालिका आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

२. सदर परीक्षेमधील खालील विवरणपत्रात नमूद केलेल्या आकृत्यांवर / नकाशांवर आधारित प्रश्नांच्या मुल्यांकनात दृष्टीहीन / क्षीणदृष्टी उमेदवारांना सवलत देण्याचे प्रस्तावित आहे, याची दृष्टीहीन / क्षीणदृष्टी उमेदवारांनी नोंद घ्यावी.

| अ.क्र. | संच A | संच B | संच C | संच D |
|---|---|---|---|---|
| १ | ६५ | ५५ | ४२ | ८० |
| २ | ६७ | ५७ | ४४ | ८२ |
| ३ | ७२ | ६२ | ४९ | ८७ |
| ४ | ७७ | ६७ | ५४ | ९२ |
| ५ | ८० | ७० | ५७ | ९५ |

३. प्रस्तुत परीक्षेसाठी उपस्थित उमेदवारांना उत्तरतालिकेवर हरकती सादर करावयाच्या असल्यास, आयोगाच्या संकेतस्थळावरील दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकातील तरतुदीनुसार केवळ ऑनलाईन पध्दतीने सादर करणे आवश्यक आहे. उत्तरतालिकेबाबत हरकती सादर करण्याची सुविधा दिनांक ११ मे, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत सुरु राहील.

४. विहित ऑनलाईन पध्दती व्यतिरिक्त अन्य कोणत्याही नमुन्यातील अथवा अन्य कोणत्याही मार्गाने/पध्दतीने सादर करण्यात आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

५. ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यात कोणत्याही तांत्रिक अडचणी उद्भवल्यास आयोगाच्या सुविधा केंद्राच्या १८००-१२३४-२७५ व ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर तसेच support-online@mpsc.gov.in या ईमेलवरुन विहित कालावधीत आवश्यक मदत प्राप्त करुन घेता येईल.

परीक्षा नियंत्रक व सहसचिव

ठिकाण : मुंबई

महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई